**महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जालना**
**पंचायत समिती परिसर, जालना**

जा.क्र./MSRLM/ Nivas / 464 /२०२५ दिनांक- 27 / ०१/२०२५

<u>दरपत्रक विनंतीपत्र</u>

प्रती,

------------------------------

------------------------------

------------------------------

विषय - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण स्वयंसहाय्यता समुहा मार्फत उत्पादित वस्तुंचे सन २०२४-२५ या वर्षामध्ये जालना येथे छत्रपती संभाजीनगर विभागीय व जालना जिल्हा जिल्हास्तरीय “जानकी” विक्री व प्रदर्शनाकरीता **निवास व इतर अनुषंगीक कामाचे दर**पत्रक सादर करणेबाबत.

माननीय महोदय,

1. ग्रामीण स्वयंसहाय्यता समुहा मार्फत उत्पादित सन २०२४-२५ या वर्षामध्ये जालना येथे छत्रपती संभाजीनगर विभागीय व जालना जिल्हा जिल्हास्तरीय “जानकी” विक्री व प्रदर्शन . . . जालना येथे आयोजीत करण्यात येत आहे. त्याकरीता खालील प्रदर्शनाकरीता **निवास व इतर अनुषंगीक कामाचे** दरपत्रक मागविण्याबाबत.

| अ.क्र | साहित्याचा तपशील | नग |
|---|---|---|
| १ | महिलांची निवास व्यवस्था (गादी ,स्नानगृह, प्रसाधनगृह व पाणी व्यवस्थेसह) प्रती रूम प्रती दिन ( अंदाजे ४०० महिलांकरीता सहा दिवस) | १ |

- उपरोक्त दिलेली संख्या ही अंदाजीत असुन त्याचा मुल्यमापनासाठी विचार करण्यात येईल तसेच त्यामध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना बदल होऊ शकतो. तसेच आवश्यकते नुसार वेळोवेळी पुरवठा आदेश देण्यात येईल.

1. **दरपत्रक सादर करताना सोबत जोडावयाची प्रमाणपत्रे**
   A) PAN CARD जोडावे व मागील वर्षाचे आयकर रिटर्न दाखल केल्याचे प्रमाणपत्र B)SHOP & ESTABLISHMENT ACT अंतर्गत नोंदणीकृत प्रमाणपत्र किंवा इतर सक्षम प्राधिकरण अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे C) GOODS & SERVICE TAX REGISTRATION प्रमाणपत्र जोडावे.
2. **बोलीचे/निविदा/देऊ केलेलेमूल्य**(Bid Price)
   अ) पुरवठादाराने अदा करावयाचे सर्व शुल्क, कर व अन्य उपकर दरामध्ये समाविष्ट करावेत.
   आ) वस्तु/सेवांचे दर खुल्या बाजार भावानुसार सुसंगत किंवा मिळते जुळते असावेत
   इ) दुरुस्ती असल्यास त्यावर काट मारून, छोटी स्वाक्षरी करून तारीख लिहून पुन्हा योग्य असेल ते लिहावे.
3. प्रत्येक पुरवठादाराने फक्त एकच दरपत्रक सादर करावे.
4. दरपत्रकाचीवैधता : दरपत्रक सादर करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या शेवटच्या तारखे पासून ३० दिवसांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीसाठी दरपत्रक वैध राहील.
5. **दरपत्रकांचे मूल्यमापन** : सर्व दरपत्रकांचे मूल्यमापन व तुलना करून ठोस प्रतिसाद देणाऱ्या म्हणजेच व्यवस्थित स्वाक्षरीत असलेल्या व नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींशी अभिसंगत असणाऱ्या दरपत्रकांचे **सर्व बाबींचे मिळून** मूल्यमापन केले जाईल.

6. निवड झालेल्या पुरवठादारास रु. 100/- च्या मुद्राक शुल्क (Bond Paper) वर करार करुन दयावा लागेल त्याचा खर्च पुरवठादारास करावा लागेल.
7. स्विकृत निविदेतील दरानुसार साहीत्याचा गुणवत्तापुर्वक पुरवठा करणे बंधनकारक राहील अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.
8. कार्यक्रमा दरम्यान कोणत्याही साहीत्याच्या नुकसानाची व जतन करण्याची जबाबदारी ही पुरवठाधारकाची राहील.
9. पुरवठा केल्यावर व त्याचा स्वीकार केल्यानंतर देयक अदा केले जाईल व देयकातुन शासनाच्या प्रचलित नियमानुसार आयकर, विक्रीकर रक्कम कपात करण्यात येईल.
10. वर जरी काहीही म्हटले असले, तरी सुद्धा कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे, खरेदीप्रक्रिया रद्दकरण्याचे व कंत्राट बहाल करण्याआधी सर्व दरपत्रक फेटाळण्याचे अधिकार खरेदीदार राखून ठेवीत आहेत. **मंडप व इतर अनुषंगीक कामाचे** दरपत्रक असे शिरोरेखीत लिहिलेल्या सील बंद लिफाफ्या मध्ये सर्व दस्तऐवज व विहीत नमुन्यातील साहीत्य व सेवेचे दर. दि.03 / ०2/२०२५ रोजीच्या दुपारी १३.३० वाजेपर्यंत ,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती परिसर, जालना येथे सादर करावा्यात.
11 पुरवठादारांच्या प्रतिनिधींच्या समक्ष दि03 /02/२०२५ रोजी दुपारी 15.30 वाजता दरपत्रक ,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती परिसर, जालना येथे खुल्या केल्या जातील.
12 दरपत्रक सादर करण्यासाठीच्या निर्धारित कालमर्यादे नंतर प्राप्त झालेल्या सर्व दरपत्रक फेटाळल्या जातील.

जिल्हा अभियान संचालक
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना

**दरपत्रकचा नमुना (पुरवठादाराच्या लेटरहेड वर, उपलब्ध नसल्यास पुरवठादाराचा शिक्का)**

दिनांक / ०१/२०२५

प्रती,
जिल्हा अभियान संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,जालना.

विषय - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण स्वयंसहाय्यता समुहा मार्फत उत्पादित वस्तुंचे सन २०२४-२५ या वर्षामध्ये जालना येथे छत्रपती संभाजीनगर विभागीय व जालना जिल्हा जिल्हास्तरीय "जानकी" विक्री व प्रदर्शनाकरीता **निवास व इतर अनुषंगीक कामाचे दर**पत्रक सादर करणेबाबत.
संदर्भ : आपले दिनांक / ०१/२०२५ चे दरपत्रक सादर करण्याबाबतचे विनंती पत्र.

माननीय महोदय,
आपल्या गरजेनुसार अतिशय रास्त व स्पर्धात्मक दर असलेली दरपत्रक सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे

| अ.क्र | साहित्याचा तपशील | नग | पुरवठा दराने नमूद करावायाचे दर (रूपये) |
|---|---|---|---|
| १ | महिलांची निवास व्यवस्था (गादी ,स्नानगृह, प्रसाधनगृह व पाणी व्यवस्थेसह) प्रती रूम प्रती दिन ( अंदाजे ४०० महिलांकरीता सहा दिवस) | १ | |
| | | एकुण रक्कम रूपये | |

वरील नमूदवस्तू दरपत्रकसाठीच्या विनंतीमधील तांत्रिक विनिर्दिष्टाला अनुसरून व इतर अटी व शर्ती नुसार एकूण कंत्राट मूल्य रु ___________ (आकड्यांमध्ये) रुपये ______________________________________(शब्दांमध्ये) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत सेवा पुरविण्यास आम्ही तयार आहोत. सदरील साहीत्य पुरवठा करण्यात विहीत वेळेत करण्यात येईल.

सेवा पुरवठादाराची शिक्क्यासहित स्वाक्षरी